दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2024-2026
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● शुक्रवार दि.१३ डिसेंबर २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक ३८८ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

थोडक्यात



शेतात घुसला गव्याचा कळप

पणजी । वार्ताहर

कासारवर्णे चांदेल येथील शेतात घुसला गव्याचा कळप. गवे शेतीचे नुकसान करत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी असून वन खात्याने याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे!



जगभरात पडल बंद फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम

मुंबई । प्रतिनिधी

जगभरात बुधवारी रात्री मेटाचे सर्व्हर डाऊन झाल्याने मेसेजिंग प्लॅटफॉर्म व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, फेसबुक आणि थ्रेड युजर्सना अडचणींचा सामना करावा लागला. भारतात रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास मेटा प्लॅटफॉर्म्सबाबत तक्रारी येण्यास सुरूवात झाली. युजर्सना व्हॉट्सॲपवर मेसेजेस पाठवण्यास तसेच मिळण्यास अडचण येत होती. याचपद्धतीने इन्स्टाग्राम, फेसबुक आणि थ्रेडवरही फीड अपलोड मिळण्यास अडचण येत होती. व्हॉट्सप व्यतिरिक्त इन्स्टाग्राम, फेसबुक आणि थ्रेड यांचे स्वामित्वही मेटाजवळ आहे. या चारही लोकप्रिय सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्सच्या युजर्सना साधारण तासाभराहून अधिक काळ अडचणींचा सामना करावा लागला. साधारण रात्री २ वाजण्याच्या सुमारास सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स सुरू झाले.या अडचणीमुळे सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर मीम्सचा पूर आला होता. युजर्स एलन मस्कचे स्वामित्व असलेल्या ट्विटवरवर या गोष्टीबाबत चर्चा करत होते.

बोटीवरून पडून खलाशाचा मृत्यू

दापोली । प्रतिनिधी

झोपेत बोटीवरून समुद्राच्या पाण्यात पडून खलाशाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी दापोली तालुक्यातील हर्णे बंदरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय शांताराम पोस्टुरे (३७, रा.पंदेरी-बहिरवली, मंडणगड) असे खलाशाचे नाव आहे. पोस्टुरे हा सुरेश चोगले यांच्या मासेमारी बोटीवर कामाला होता. बोट मासेमारी करून परतल्यावर बोट हर्णे समुद्रकिनारी उभी होती. या बोटीवर संजय पोस्टुरे आणि तांडेल झोपले होते. मंगळवारी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान निवास हुमणे हा खलाशी उठला असता, पोस्टुरे जागेवर दिसला नाही. त्यांनी इतर खलाशांना सांगून शोध सुरु केला. सकाळी हर्णे बायपास पाळंदे येथे समुद्रकिनारी त्यांचा मृतदेह आढळला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

सिंधुदुर्ग समाचार
दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

परभणी शहरात तणावपूर्ण शांतता
तोडफोडीनंतर ५० जण ताब्यात

परभणी । वृत्तसंस्था

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील संविधानाच्या प्रतिकृतीच्या तोडफोडीनंतर शहरात तणावपूर्ण शांतता पसरली आहे. घटनेच्या निषेधार्थ गुरूवारी (ता.१२) पुकारलेल्या बंदला हिंसक वळण लागले होते. आज सलग दुसऱ्या दिवशीही शहरातील सर्व व्यापारी आस्थापने बंद होती. पोलिसांनी बुधवारी रात्रीपासून कोंबिंग ऑपरेशन राबवून ५० जणांना ताब्यात घेतले. शिवाय सार्वजनिक व खासगी मालमत्तांच्या नुकसानीसह शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध पाच गंभीर गुन्हे दाखल केल्याचे अप्पर पोलिस अधीक्षक यशवंत काळे यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील राज्यघटनेच्या प्रतिकात्मक प्रतिकृतीचा माथेफिरूने अवमान केल्याच्या घटनेनंतर परभणी शहरात संतापाची लाट उसळली. या घटनेच्या निषेधार्थ पुकारलेल्या परभणी 'बंद'ला बुधवारी हिंसक वळण लागले.

दगडफेक, जाळपोळ, तोडफोडीच्या घटना घडल्या. आणि मोठ्या प्रमाणावर शहरात तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचं नुकसान झालं आहे. यानंतर पोलिसांनी शहरातील दलित वस्तीमध्ये कोबिंग ऑपरेशन राबवलं यामध्ये अनेक निरपराध नागरिकांना पोलिसांनी मारहाण केल्याचा आरोप आंबेडकरी समाजाकाडून करण्यात आला आहे. दरम्यान, परभणीत सलग दोन दिवस झालेल्या घटनेप्रकरणी ८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यात ५० जण अटकेत आहेत. यामध्ये ४१ पुरुष तर ९ महिलांचा समावेश आहे. दरम्यान, शहरात सध्या तणावपूर्ण शांतता असून राज्य राखीव पोलीस दलाची कुमक तैनात आहे. काल परिस्थिती नियंत्रणात आणताना दुपारी आणि सायंकाळी ५० लोकांना अटक करण्यात आली. पोलिसांनी काल रात्री कोणतंही कोंबिग ऑपरेशन केलं नाही, असा खुलासा यावेळी शहाजी उमप यांनी केला आहे.

पोलिसांना सौम्य लाठीमार करून जमाव पांगवावा लागला. शहरात दिवसभर तणावपूर्ण स्थिती होती. सायंकाळी ही स्थिती नियंत्रणात आली. शहरात ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात असून विविध पातळ्यांवरून शांततेचे आवाहन केले जात आहे.प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून परभणी शहर, जिल्ह्यात दुपारी एकपासून जमावबंदी आदेश लागू करण्याचे आदेश पोलिस प्रशासनाला दिल्याची माहिती जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिली. काहीकाळ इंटरनेटसेवा बंद ठेवण्यात आली होती. दरम्यान, शांतता राखण्याचे आवाहन गावडे यांच्यासह पोलिसांनी केले.येथील स्टेशन रोड भागातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. तेथे संविधानाची सिमेंटपासून बनविलेली प्रतिकृती असून तिला काचेचे आवरण होते. एका माथेफिरूने मंगळवारी सायंकाळी प्रतिकृतीवरची काच फोडली. त्यानंतर तेथे जमलेल्या जमावाने माथेफिरूला चोप दिला होता.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी जनतेने आज 'बंद'ची हाक दिली होती. त्यानुसार सकाळपासून शहरात बंद पाळण्याचे आवाहन करण्यात आले. त्याला व्यापाऱ्यांनीही समर्थन दिले. मात्र, दुपारनंतर जमावाने विविध भागांत दगडफेक करत दुकाने, वाहनांची तोडफोड सुरू केली. स्टेशन रोड, जिंतूर रोड, वसमत रोड या परिसरात उभ्या असलेल्या अनेक वाहनांना

पान ३ वर...

हायस्पीड ट्रॉलर्सची घुसखोरी तात्काळ बंद करा, अन्यथा गिलनेट मासेमारी बंद होईल

मालवण । वार्ताहर

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या समुद्रात परराज्यातील हायस्पीड ट्रॉलर्सची घुसखोरी व उच्छाद वाढला असून याबाबत कारवाई होत नसल्याने आज शिरोडा वेंगुर्ला येथील मच्छिमारांनी आक्रमक भूमिका घेत मालवण येथील सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालयात धडक देत जाब विचारला. किनाऱ्यालगत ५ ते ६ वाव जलधी क्षेत्रात परराज्यातील हायस्पीड ट्रॉलर्स मासेमारी करत असून त्यांच्याकडून स्थानिक पारंपारिक पद्धतीने गिलनेट मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांची समुद्रातील जाळी तोडून मोठे नुकसान केले जात आहे. यामुळे गिलनेट मासेमारी बंद होण्याचा धोका असून मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन जिल्ह्याच्या समुद्रातील हायस्पीड ट्रॉलर्सची घुसखोरी तात्काळ बंद करावी, अशी मागणी मच्छिमारांकडून मत्स्य विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. मत्स्यव्यवसाय कार्यालय मालवण येथे वेंगुर्ला येथील मच्छीमारांनी धडक देऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी श्रमिक मच्छिमार संघ मालवणचे उपाध्यक्ष बाबी जोगी, मच्छिमार नेते रविकिरण तोरसकर, जगदीश खराडे, अक्षय रेवंडकर, पंकज सादये, शिरोडा मच्छिमार सहकारी सोसायटीचे श्रीकृष्ण सारंग, स्वप्नील कोळंबकर, अंकुश म्हाकले, राधाकृष्ण तांडेल, सत्यविजय पडते, देशपाल कोळंबकर, नाना

पान ३ वर...

विनायक राऊतांची याचिका फेटाळण्यासाठी नारायण राणेंचा कोर्टात अर्ज

मुंबई । प्रतिनिधी

भाजप नेते आणि माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते विनायक राऊत यांनी दाखल केलेल्या याचिकेविरोध करणारा हस्तक्षेप अर्ज दाखल केला आहे.

रत्नागिरी- सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील भाजप खासदार नारायण राणे यांच्या निवडीला विनायक राऊत यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. नारायण राणे यांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक जिंकण्यासाठी भ्रष्ट आणि बेकायदेशीर पद्धतींचा अवलंब केल्याचा आरोप विनायक राऊत यांनी केला होता. त्यानंतर आता खासदार नारायण राणे यांनी हस्तक्षेप अर्ज दाखल केला आहे.

अधिवक्ते सतीश मानेशिंदे यांच्यामार्फत दाखल केलेल्या हस्तक्षेप अर्जात विनायक राऊत यांची याचिका फेटाळण्याची मागणी केली आहे. विनायक राऊत यांच्या याचिकेत तथ्ये आणि तपशील नसल्याचे नारायण राणे यांनी म्हटलं आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात नारायण राणे विरुद्ध विनायक राऊत अशी लढत झाली होती. त्यात नारायण राणे यांनी विजय मिळवला होता. त्यानंतर विनायक राऊत यांनी वकील असीम सरोदे यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत नारायण राणे यांनी फसवणुकीने निवडणूक जिंकल्याचा आरोप केला होता.

विनायक राऊत यांच्यामार्फत दाखल केलेल्या निवडणूक याचिकेत दोष असल्याचा आरोप करत पैसे वाटप करणाऱ्या व्यक्तींच्या नावांच्या संदर्भात कोणत्याही तपशीलांचा उल्लेख नसल्याचे म्हटलं आहे. निवडणूक याचिकेत आरोपांची संपूर्ण माहिती देणे आवश्यक असते. या कृत्यामध्ये असलेल्या पक्षाचे नाव आणि अशी घटना

पान ३ वर...

खारेपाटण येथे मोटरसायकल व कंटेनर मध्ये अपघात

खारेपाटण । वार्ताहर

गोवा राष्ट्रीय महामार्गावर खारेपाटण बॉक्सवेल ब्रिजवर आज रात्री ८.३० च्या दरम्यान मोटार सायकल व कंटेनर यांच्यात समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात मोटार सायकल स्वार सचिन एकनाथ लाड राहणार हसोळ तळी,राजापूर वय ३५ हा जागीच ठार झाला असून त्याच्या सोबत असलेला तानाजी वामन शेळकर वय ३० राहणार कोडवशी,राजापूर शिळकर वाडी हा गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी प्रा.आ.केंद्र येथे

नेला असता तो सुधा मयत झाला. याबाबत अधिक वृत्त असे की, हासोळ येथील बाईक स्वार आपल्या ताब्यातील हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल क्र.एम एच ०८ एक्स ४२५२ घेऊन खारेपाटण मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर आला असता खारेपाटण बॉक्सवेल ओवर फ्लाय ब्रिजवर चूकीच्या साईडने

पान ३ वर...

डोकीवर दगड मारून दुखापत केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

कणकवली । प्रतिनिधी

चार दिवसापूर्वी झालेल्या वादाची माहिती का दिली अशी विचारणा करत त्या रागातून डोक्यावर दगड मारून गंभीर दुखापत केल्याची तक्रार प्रकाश शामराव शिंदे (वय ३९ कणकवली बांधकरवाडी) यांनी कणकवली पोलिसात दिली आहे. या तक्रारीनुसार कणकवलीतील वैभव मालंडकर व कलमठ मधील रीमेश चव्हाण व यांच्यासोबत एका अनोळखी २५ वर्षीय तरुण यांच्यावर बी एन एस कलम ११८ (१),

३५२, ३५१ (३), ३ (५) नुसार कणकवली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रकाश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ११ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता रीमेश चव्हाण यांनी फिर्यादी याना अन्नपूर्णा बार येथे बोलावून घेतले. त्यावेळी संशयित आरोपीने मद्यपान केले होते. त्याचे बिलाचे पैसे मी दिल्याचे फिर्यादीत प्रकाश शिंदे यांनी म्हटले आहे. त्यानंतर ९.१५ वाजण्याच्या सुमारास रीमेश चव्हाण यांनी वैभव मालंडकर याला फोन लावून बोलावून घेतले. त्यानंतर वैभव मालंडकर व त्याच्यासोबत अजून एक अनोळखी व्यक्ती त्या ठिकाणी आली. चार दिवसापूर्वी रिमेश चव्हाण यांचे गोट्या सावंत यांच्याशी वाद झाले होते. त्यावेळी वैभव मालंडकर याला फिर्यादी यांने रीमेश याने गोट्या सावंत यांच्याशी वाद का घातले

पान ३ वर...

जिल्हा बँकेच्या ओरोस कार्यालया समोर उपोषण छेडणार !

कणकवली । वार्ताहर

केवळ शिवसेना पक्षाचे काम करतात म्हणून मोंड येथील जिल्हा बँकेच्या एका पिग्मी एजंटला काढून टाकण्यात आले आहे. दरमहा सुमारे तीन लाखाची उलाढाल असूनही राजकीय आकसापोटी या पिग्मी एजंटवर कारवाई करण्यात आली आहे. या विरोधात सोमवारी १६ डिसेंबरला जिल्हा बँकेच्या ओरोस येथील प्रधान कार्यालयासमोर आपण लाक्षणिक उपोषण करणार असल्याची माहिती युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक यांनी आज दिली. कणकवलीत

श्री.नाईक यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांच्यासोबत युवासेना तालुकाप्रमुख उत्तम लोके होते. सुशांत नाईक म्हणाले, विधानसभा निवडणुकीनंतर भाजपकडून सुडाचे राजकारण सुरू झाले आहे. मोंड येथील पिग्मी एजंट सायली घाडी ह्या मागील २४ वर्षे प्रामाणिकपणे काम करत आहेत. त्यांची दरम

पान ३ वर...

कर्नाटक ट्रॉलर्सची घुसखोरी कायम ! रविकिरण तोरसकर यांचा आंदोलनाचा इशारा

कुडाळ । प्रतिनिधी

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी जलधिक्षेत्रात परप्रांतीय लोकांची घुसखोरी वाढल्याने तात्काळ नवीन हायस्पीड गस्ती नौका कारवाईसाठी उपलब्ध करून देण्यात यावी आणि परप्रांतीय नौकांवर तात्काळ करण्यास कारवाई करण्यासाठी ड्रोन कॅमेरा उपलब्ध करून देण्यात यावेत अशा प्रकारची मागणी श्रमिक मच्छीमार संघाच्या वतीने रविकिरण तोरसकर यांनी जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) यांच्याकडे केली होती. परंतु दिलेली मुदत उलटूनसुद्धा कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे मत्स्यव्यवसाय विभागाने वरील दोन गोष्टींची पूर्तता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत न केल्यास प्रशासनाला जाग आणण्यासाठी दि ०१ जानेवारी २०२५ पासून जिल्ह्यातील व राज्यातील विविध मच्छीमार संघटनाना सोबत घेऊन बेमुदत धरणे आंदोलन मत्स्य कार्यालय, मालवण येथे करण्यात येईल.असा इशारा श्रमिक मच्छीमार संघाच्या वतीने रविकिरण तोरसकर यांनी दिला आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात श्री. तोरसकर

म्हणतात, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी जलधीक्षेत्रात परप्रांतीय नौकांचा धुडगूस वाढला असून याबाबत स्थानिक मच्छीमार यांच्यामध्ये असंतोष पसरला आहे. विशेषतः कर्नाटक मलपी येथील हाय स्पीड बोटिचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होत आहे .सदर विषयात मी दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी लाक्षणिक उपोषण केले होते. सदरचे उपोषण मागे घेताना आपल्या कार्यालयाने सदरच्या विषयात तातडीने कारवाई व्हावी यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे जावक क्रमांक मत्स्य /स/आ /म/ सिं-मा तां/११/८०४५/२०२४ या जावक क्रमांकाने

१) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी जलधिक्षेत्रात परप्रांतीय लोकांची घुसखोरी वाढल्याने तात्काळ नवीन हायस्पीड गस्ती नौका कारवाईसाठी उपलब्ध करून देण्यात यावी अथवा सद्यस्थितीत लगतच्या जिल्ह्यातून हाय स्पीड गस्ती नौका उपलब्ध करून द्यावी

२) परप्रांतीय नौकांवर तात्काळ करण्यास कारवाई करण्यासाठी ड्रोन कॅमेरा उपलब्ध करून देण्यात यावेत अशा प्रकारची मागणी केली होती. तसेच खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मुख्य आयुक्त अतुल पाटणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला होता. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरील विषयाबाबत तातडीने पावले उचलावीत अशी मागणी त्यांनी केली होती. यावर आयुक्त अतुल पाटणे यांनी दहा

पान ३ वर...

मोती तलावातील मृतदेहाची ओळख पटली

सावंतवाडी । प्रतिनिधी

सावंतवाडी नगरपालिकेच्या समोरील मोती तलावात राजेश चद्रकांत पाटकर (वय ५५ वर्षे, सध्या. रा. कुडाळ पिंगळी, मुळ रा. समाजमंदिर, सावंतवाडी,) याचा मृतदेह आढळून आला. तलावाच्या काठी बसल्यावर तोल जाऊन पडून बडून हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला असा अंदाज वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला असून येथील पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शहरात गुरुवारी सकाळी तलावाच्या मध्यभागी नगर पालिकेसमोर एक मृतदेह तरंगताना नागरिकांना दिसून आला. याबाबत सावंतवाडी पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय कातिवले पोलीस हवालदार मनोज राऊत सुनील नाईक हनुमंत धोत्रे आदींनी धाव घेतली सदरचा मृतदेह पालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत बोटीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आला. यावेळी सदरचा मृतदेह हा समाज मंदिर येथील राजेश पाटकर याचा असल्याचे समोर आले याबाबत पोलिसांनी त्याचा भाऊ सचिन पाटकर याला घटनास्थळी बोलावून घेतले.

पान ३ वर...

सिंधुदुर्ग समाचार
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

एक राष्ट्र, एक निवडणूक लोकशाहीवर हल्ला ?

केंद्रीय मंत्रिमंडळाने आज वन नेशन वन इलेक्शन विधेयकाला मंजुरी दिली आहे. हे विधेयक लवकरच संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे. या निर्णयामुळे देशाच्या राजकारणात तापलेली परिस्थिती आणखीच गढूळली आहे. वन नेशन वन इलेक्शन म्हणजेच एक देश, एक निवडणूक या प्रस्तावाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मार्चमध्ये सादर केले होते. या प्रस्तावात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याच्या सूचना दिल्या आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर १०० दिवसांत घेण्याची शिफारस केली आहे. परंतु, एक देश, एक निवडणूक लागू झाल्यास त्याचे फायदे काय असतील, यावर प्रश्नचिन्ह आहे. तसेच, प्रादेशिक पक्षांचा या निवडणूक पद्धतीला विरोध का आहे, याचे विश्लेषणही करणे आवश्यक आहे.

वन नेशन वन इलेक्शन ही संकल्पना भारतात नवी नाही. १९५१/५२ ते १९६७ पर्यंत, देशाने चार सार्वत्रिक निवडणुका पाहिल्या होत्या, ज्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेतल्या जात होत्या. १९५७, १९६२ आणि १९६७ च्या निवडणुकांनंतर केवळ तीन वेळा ही पद्धत अवलंबली गेली. परंतु, १९६८ आणि १९६९ मध्ये काही विधानसभांची मुदतपूर्व विसर्जित झाल्यामुळे आणि १९७० मध्ये लोकसभेचे मुदतपूर्व विसर्जन झाल्यामुळे ही पद्धत खंडित झाली. सध्याच्या स्थितीत, लोकसभेनंतर केवळ सात राज्ये एकाचवेळी मतदान करतात. यात आंध्र प्रदेश, सिक्कीम आणि ओडिशा यांचा समावेश आहे. या वर्षी लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान या राज्यांच्या निवडणुका झाल्या होत्या. तर महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड या राज्यांच्या निवडणुका वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत होतात.

वन नेशन वन इलेक्शन प्रस्तावासाठी घटनादुरुस्ती आवश्यक आहे. यासाठी आर्टिकल ८३ (संसदेतील सभागृहांचा कालावधी), आर्टिकल ८५ (लोकसभेचे विसर्जन), आर्टिकल १७२ (राज्य विधानसभांचा कालावधी), आर्टिकल १७४ (राज्य विधानसभांचे विसर्जन) आणि आर्टिकल ३५६ (राज्यांमध्ये राष्ट्रपती शासन लागू करण्यासंबंधी) या कलमांमध्ये दुरुस्ती करावी लागेल. मात्र, भाजपकडे आवश्यक विशेष बहुमत नाही. विशेष बहुमतासाठी लोकसभेत आणि राज्यसभेत दोन तृतीयांश मतांची आवश्यकता आहे. भाजपकडे राज्यसभेत ५२ आणि लोकसभेत ७२ मतांची कमतरता असल्या मुळे, त्यांना विरोधी पक्षाचा पाठिंबा आवश्यक आहे. याशिवाय, नगरपालिका आणि पंचायत निवडणुकांशी संबंधित विधेयक आणखी गुंतागुंतीचे आहे कारण त्यासाठी सर्व राज्यांपैकी किमान निम्म्या राज्यांची मान्यता आवश्यक आहे.

सध्या, भाजप आणि त्यांच्या सहकारी पक्षांचे १९ राज्ये आणि एक केंद्रशासित प्रदेशांवर सत्ता आहे. तर, इंडिया आघाडीची ८ राज्ये आणि एक केंद्रशासित प्रदेशांवर सत्ता आहे. इंडिया आघाडीने या निवडणूक पद्धतीचा तीव्र निषेध करण्याची शक्यता आहे, ज्यामुळे प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात.

वन नेशन वन इलेक्शन पद्धतीचे समर्थन भाजपने सुरुवातीपासून केले आहे. देशात एकाचवेळी निवडणुका झाल्यास देशाची आणि राज्यांची आर्थिक स्थिती सुधारेल, असे भाजपचे म्हणणे आहे. कारण, केंद्र आणि राज्य सरकारांना धोरण निर्मिती आणि प्रशासकीय काम काजावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी वेळ मिळेल. निवडणुकांवेळी लाखो कामगार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात, ज्यामुळे उत्पादन प्रकल्पांवर ताण येतो. एक देश, एक निवडणुकीमुळे पुरवठा साखळी आणि उत्पादन निर्मितीत अडथळे येणार नाहीत, असा काही तज्ज्ञांचा दावा आहे. १०-१५ निवडणुका एकत्र घेतल्या जाऊ शकतात. जर पैसा आणि वेळ वाचवला तर भारताला २०४७ ची वाट पाहावी लागणार नाही. विकसित भारताचे स्वप्न त्यापूर्वीच पूर्ण होईल, असा दावा माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला होता. तसचं कायदामंत्र्यांनी संसदेत, एकत्रित निवडणुका झाल्यास आर्थिक बचत होईल, कारण दरवेळी सुरक्षा दल तैनात करावी लागणार नाहीत आणि राजकीय पक्षांचाही खर्च कमी होईल, असा दावा केला होता.

विरोधी पक्षांनी एक देश, एक निवडणूक या संकल्पनेला तीव्र विरोध दर्शवला आहे. मंत्रिमंडळाने कोविंद समितीचा अहवाल मंजूर केल्यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी तीव्र विरोध केला होता. त्यांच्या मते, ही पद्धत अव्यवहार्य आणि लोकशाहीविरोधी आहे, जी प्रादेशिक आवाज पुसून टाकेल, संघराज्य नष्ट करेल आणि प्रशासनाला बाधा आणणारी ठरेल.

एकत्रित निवडणुका घेण्याची संकल्पना ही देशाच्या विकासासाठी आणि आर्थिक बचतीसाठी उपयुक्त ठरू शकते, परंतु त्यासाठी आवश्यक त्या घटना दुरुस्त्या, राजकीय सहमती आणि प्रशासनिक तयारी महत्त्वाची आहे. वन नेशन वन इलेक्शन लागू करण्यासाठी भाजपला विरोधी पक्षांचा पाठिंबा आवश्यक आहे, कारण खास करून राज्यसभा आणि काही राज्यांमध्ये त्यांची स्थिती मजबूत नाही. त्यामुळे, एकत्रित निवडणुकांची पद्धत लागू करणे एक मोठे आव्हान ठरणार आहे.

भारताची अर्थव्यवस्था वाढीचा वेग मंदावण्यामागची कारणे?

वेगाने वाढणारी भारताची अर्थव्यवस्था आता आपल्या वाढीचा वेग गमावत आहे का? असा प्रश्न निर्माण होण्याचं कारण म्हणजे, जीडीपीचे अलीकडचे आकडे पाहता चिंताजनक चित्र निर्माण होत आहे. जुलै आणि सप्टेंबरदरम्यान भारताची अर्थव्यवस्था ५.४ टक्के सात तिमाहींमधील नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (ठ्ढख) ने वर्तवलेल्या ७ टक्क्यांच्या अंदाजापेक्षा ही आकडेवारी खूपच कमी आहे. पण असं असलं तरीही इतर विकसित देशांच्या तुलनेत अद्याप भारताची अर्थव्यवस्था मजबूत स्थितीतच आहे. तरीही, ही आकडेवारी अर्थव्यवस्थेतील मंदीची चाहूल देणारी आहे. यामागे अनेक घटक कारणीभूत असल्याचं अर्थतज्ज्ञ सांगतात. ग्राहकांकडून वस्तू किंवा उत्पादनांच्या मागणीमध्ये घट झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून खासगी गुंतवणूक कमी प्रमाणात होत आहे.

त्यासोबतच, अलीकडच्या वर्षांत अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा ठरणारा सरकारी खर्चदेखील कमी झाला आहे. भारताच्या निर्यातक क्षेत्रालाही दीर्घकाळ समस्यांचा सामना करावा लागत आहे. २०२३ मध्ये, जागतिक निर्यातीमध्ये भारताचा वाटा फक्त २% राहिला. इतकंच नाही तर २०२४-२५ आर्थिक वर्षासाठी विकासदराचं चांगलं भाकित करणाऱ्या रिझर्व्ह बँकेने त्यात बदल करून आता ६.६ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला आहे.

एकीकडे जीडीपीच्या ताज्या आकड्यांमुळे बरीच चिंता आणि गोंधळाचं वातावरण तयार झालं आहे. परंतु, या समस्या आता सुरू झाल्या नसून त्या गेल्या काही काळापासून वाढत आलेल्या आहेत. सध्या अर्थव्यवस्था मंदावल्याचं स्पष्टपणे दिसत आहे तसेच मागणीमध्येही तुटवडा निर्माण झाल्याने ती एक मोठी समस्या आहे. दुसरीकडे, अर्थमंत्री निर्मला सीतारामण मात्र सर्व काही आलबेल असल्याचं चित्र दाखवतात. गेल्या आठवड्यात त्या म्हणाल्या की, जीडीपीच्या आकड्यांमधील घट ही संपूर्ण अर्थव्यवस्थेसमोरची मोठी समस्या नाही. सरकारने गेल्या तिमाहीमध्ये निवडणुकीच्या काळात खर्चामध्ये कपात केली होती, त्यामुळे हे घडलं आहे. तिसऱ्या तिमाहीमध्ये होणारी वाढ ही घसरण भरून काढेल अशी अपेक्षा त्यांना आहे. भारतासमोर स्थिर वेतनामुळं कमी झालेली क्रयशक्ती, जागतिक मागणीमधील मंदी आणि हवामानातील व्यत्यया मुळे असलेली शेतीसमोरची आव्हाने या समस्या असल्या तरी, भारत सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था राहील, असंही त्या म्हणाल्या.

सरकारमधील वरिष्ठ मंत्री, अर्थतज्ज्ञ आणि आरबीआयच्या पतधोरणाशी संबंधित माजी सदस्यांसह काहींच्या मते, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचं लक्ष महागाई नियंत्रित करण्यावर केंद्रीत असतं. त्यामुळं व्याजदरांवरील मर्यादांमुळं विकासात अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. उच्च व्याजदरांमुळे व्यावसायिक तसेच सामान्य लोकांना कर्ज घेणं अधिक महाग होऊन बसतं. यामुळे गुंतवणुकीत तसेच विक्रीमध्येही (वस्तूंचा उपभोग) घट होऊ शकते. मात्र, आर्थिक वाढीसाठी या दोन्हीही गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. वाढत्या महागाईच्या कारणास्तव रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जवळपास दोन वर्षांपासून व्याजदर स्थिरच ठेवले आहेत. ऑक्टोबरमध्ये भारतातील महागाईचा दर ६.२ टक्क्यांवर पोहोचला होता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ठरवलेल्या ४ टक्के दराची मर्यादा ओलांडत हा आकडा गेल्या १४ महिन्यांमधील उच्चांकी ठरला. उच्च व्याजदरामुळे व्यावसायिक तसेच सामान्य लोकांना कर्ज घेणं अधिक महाग होऊन बसतं. परंतु, केवळ वाढलेले व्याजदर यावरूनच मंदावलेल्या विकासामागचा स्पष्ट अंदाज येऊ शकत नाही. दर कमी केले तरीही मागणी वाढल्याशिवाय विकासाला चालना मिळणार नाही. चांगली मागणी असेल तरच गुंतवणूकदार कर्ज घेतील आणि गुंतवणूक करतील. पण सध्या मागणीच पुरेशी नाही, असं दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील अर्थविषयक अभ्यासक हिमांशू सांगतात.

भारताची अर्थव्यवस्था 'द्वी-गती मार्गावर' चालत आहे. म्हणजेच जुनी अर्थव्यवस्था आणि नवीन अर्थव्यवस्था वेगवेगळी कामगिरी करत आहेत. त्यामुळेच, सध्याचं हे आर्थिक संकट उभं राहिलं आहे. जुन्या अर्थव्यवस्थेमध्ये असंघटित क्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योग, शेती आणि पारंपरिक व्यवसाय यांचा समावेश होतो. ही क्षेत्रे अजूनही दीर्घकाळ प्रलंबित सुधारणांच्या प्रतीक्षेतच आहेत. याउलट, नवीन अर्थव्यवस्थेमध्ये कोविडनंतर सेवा निर्यात क्षेत्रामध्ये तेजी दिसून आली. त्यामुळे, २०२२-२३ मध्ये या क्षेत्रांमध्ये जोरदार वाढ नोंदवण्यात आली आहे. आउटसोर्सिंग २.० ने या वाढीमध्ये मोठी भूमिका बजावली आहे. भारत आता ग्लोबल कपॅसिटी सेंटर्ससाठी (GCC) जगातील सर्वात मोठं केंद्र म्हणून उदयास येत आहे. कारण, भारत इतर देशांसाठी उच्च दर्जाच्या सेवा पुरवणारा पुरवठादार बनला आहे.

कोरोना साथीनंतर गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून, शहरी भागातील खर्चांमध्ये वाढ झाली आहे. आता बहुतेक ऋ्छउ स्थिर स्थावर झाल्या आहेत, त्यामुळं ग्राहकांच्या क्रयशक्तीच्या पॅटर्नमध्ये बदल होत आहेत, त्यामुळे शहरी खर्चातील वाढी मध्ये घट होत आहे. अनेकजण अर्थव्यवस्थेत कमी व्याजदराची आणि अधिक लिक्वीडीटीची मागणी करतात. जुनी अर्थव्यवस्था फारशी वाढत नाहीये तर नवीन अर्थव्यवस्थेत विकासाची गती मंदावली आहे. विकासासाठी खासगी गुंतवणूक महत्त्वाची आहे. परंतु, मागणीशिवाय खासगी व्यावसायिकदेखील गुंतवणूक करू शकणार नाहीत.

गुंतवणुकीशिवाय नवीन नोकऱ्या निर्माण होणे किंवा अधिक उत्पन्न मिळणे शक्य होणार नाही. थोडक्यात, नोकऱ्या आणि उत्पन्नाशिवाय, मागणी पूर्ववत होऊ शकत नाही. इतर काही गोंधळात टाकणारी लक्षणेही आहेत. भारताचा सरासरी टॅरिफ (आयातकर) २०१३-१४ मधील ५ टक्क्यांवरून आता १७ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. अमेरिकेसोबत व्यापार करणाऱ्या अनेक आशियाई देशांपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. 'ग्लोबल व्हॅल्यू चेन'मध्ये निर्यातदार कंपन्या वेगवेगळ्या देशांतून होणाऱ्या आयातीवर अवलंबून असतात. या उच्च टॅरिफ दरामुळे कंपन्यांना व्यापारासाठी वस्तू अधिक महाग होतात. यामुळे त्यांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करणे अधिक कठीण होते.

सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताने स्वत:ची पाठ थोपटणं विकासाच्या दृष्टीनं हानिकारक आहे. गुंतवणुकीला चालना देण्यासाठी, निर्यातीसाठी तसेच नोकऱ्यांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या सुधारणांमध्ये हाच मोठा अडथळा आहे, असा इशाराही समीक्षक देतात. आपण अजूनही एक गरीब देशच आहोत. आपला दरडोई जीडीपी (सकल राष्ट्रीय उत्पादन) हा अद्यापही ३ हजार डॉलरहून कमी आहे. तर दुसऱ्या बाजूला, अमेरिकेचा दरडोई जीडीपी ८६ हजार डॉलर इतका आहे. आपण त्यांच्याहून अधिक वेगाने पुढे सरकत आहोत, असं जर तुमचं म्हणणं असेल तर त्याला काहीच अर्थ नाहीड़ दुसऱ्या भाषेत सांगायचं झालं तर, अधिक रोजगार निर्माण करण्यासाठी आणि उत्पन्न वाढवण्यासाठी भारताला अत्यंत लक्षणीय अशा उच्च आणि शाश्वत विकास दराची आवश्यकता आहे.

अल्पावधीतच विकास आणि त्यासाठी मागणी वाढवणं तितकंही सोपं नाही. खाजगी गुंतवणुकीचा अभाव असल्याने, उत्पन्न आणि मागणी वाढवण्यासाठी सरकारकडून देण्यात येणाऱ्या योजनांद्वारे रोजगार वाढवण्याची गरज आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत सरकार मात्र अजूनही असंच मानतं की, बँका मजबूत आहेत, परकीय चलन साठा भरपूर आहे आणि आर्थिक स्थिती स्थिर आहे आणि पराकोटीची गरिबी कमी झाली आहे. मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंथा नागेश्वरन म्हणतात की, आपण ताज्या जीडीपीच्या आकडेवारीचं जास्त विश्लेषण करु नये. केवळ एका वाईट गोष्टीमुळे आपण सर्व काही सोडून देऊ नये. भारताच्या एकूण विकासाची घोडदौड अजूनही म जबूत आहे, असा विश्वासही ते व्यक्त करतात.

भारताच्या आर्थिक विकासाला अधिक गती मिळणे आवश्यक आहे, हे स्पष्टच आहे. त्यामुळेच, साशंकता कायम आहे. सेनगुप्ता म्हणतात की, कोणताही देश आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पुरेसे प्रयत्न न करता इतके दिवस नुसताच महत्त्वाकांक्षी म्हणून राहू शकत नाही.

- विक्रम कदम -

निवडणूका आणि आश्वासने !

निवडणूक मग ती ग्राम पंचायतीची असो वा विधानसभेची. एकदा तारखेची घोषणा झाली कि समस्त प्रमुख पक्ष तयारीला लागतात. इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्टींचे निवडणूका म्हणजे लोकशाहीच म होत्सव. काहीजण याकडे युद्ध म्हणूनही पाहतात. प्रेमात आणि युद्धात साम, दाम, दंड, भेद सर्वकाही माफ असते त्याप्रमाणे निवडणुकांमध्ये या सर्व बाबींचा समस्त पक्षांकडून कमी अधिक प्रमाणात वापर केलाच जातो. अनेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून तयार असताना कोणालाही न दुखावता त्यापैकी एकालाच पक्षाचे तिकीट देऊन इतरांना कसे सांभाळायचे यामध्ये पक्षश्रेष्टींच्या अनुभवाचा कस लागतो. एखादा नेता आपल्या पक्षाशी किंवा स्थानिक जनतेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहे हे खरेतर निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावरच कळते. एरव्ही शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम करण्याच्या बतावण्या करणारी नेतेमंडळी पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून एका रात्रीत पक्ष बदलायला मागेपुढे पाहत नाहीत. एखादा नेता परिसरात नावाजलेला असला कि त्याला गळाला लावण्यासाठी अन्य पक्षही फासे टाकून बसलेलेच असतात. यंदा ही रस्सीखेच पाहायला मिळाली. निवडणुकांच्या तोंडावर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी समस्त पक्षांकडून त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. ज्यामध्ये आश्वासनांचा पाऊस पाडलेला असतो. या आश्वासनांमध्ये विकासासोबत महागाई नियंत्रण, जातीय आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, तरुणांना रोजगार, महिला सबलीकरण यांसारख्या अनेकविध बाबींचा प्रामुख्याने समावेश केलेला असतो. पक्षांच्या जाहीर सभांतूनही आम्हीच कसा राज्याचा विकास घडवू शकतो, आम्हीच कसे जनतेचे तारणहार आहोत याच्या बतावण्या केल्या जातात.

निवडणुका पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या पक्षाला या आश्वासनांचा सोयीस्कर विसर पडतो. मधले काही दिवस विरोधकांची उणीधुणी काढली जातात. निवडणूका जवळ आल्या कि पुन्हा विकास कामांना सुरुवात होते. वर्षोनुवर्षे भारतात हेच सुरु आहे. नेत्यांच्या आश्वासनांना सामान्य जनता बळी पडते. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी परिस्थितीत फारसा बदल होत नाही. निवडणूक आयोगाने गेल्या काही वर्षांत निवडणुकीनिमित्त केल्या जाणाऱ्या खर्चावर आणि पद्धतींवर बंधने आणल्यामुळे तसेच पूर्वीच्या तुलनेत आचारसंहिता अधिक कडक केल्याने निवडणूक प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी शिस्त आली आहे'; मात्र आश्वासने देण्यावर कोणतेही बंधन नसल्याने पक्षांचे फावते. वास्तविकतः निवडणुकांच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवरसुद्धा बंधने असायला हवीत. राजकीय पक्ष देत असलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असणार, किती कालावधीत त्यांची पूर्तता करणार, आश्वासनांपैकी किती बाबींची जनतेला खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे, एखाद्या समाजाला आरक्षण देण्याची आश्वासने तुम्ही देत आहात तर त्या समाजाला आरक्षणाची खरंच आवश्यकता आहे का ? याविषयीचा सविस्तर लेखा जोखा प्रमुख पक्षांनी प्रशासनाकडे निवडणुकीपूर्वी प्रतिज्ञा पत्रासह सादर करणे बंधनकारक करावे. या आश्वासनांच्या पूर्तीवर नियंत्रण ठेवणारे आणि त्यांना वेळोवेळी जाणीव करून देणारे स्वतंत्र मंडळ असावे. आश्वासनांची वेळेत पूर्ती न करणाऱ्यांना दंडित करण्याचे सुद्धा प्रावधान असावे. असे काही केल्याशिवाय जनतेला त्यांच्या बहुमोल मताचा मोबदला मि ळणार नाही.

जगन घाणेकर, घाटकोपर,
संपर्क क्रमांक :
९६६४५५९७८०

शरद पवार आणि भाजपची हातमिळवणी?

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपसोबत हातमिळवणी करणार का, याबद्दल तर्कवितर्क सुरू झाले आहेत. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त, गुरुवारी अजित पवार यांनी त्यांच्या कुटुंबासह दिल्लीत शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर, दुसऱ्या दिवशी, उद्योगपती गौतम अदानी यांच्या दिल्लीतील घरी शरद पवार गटातील एक वरिष्ठ नेता आणि भाजपचा एक केंद्रीय नेता यांची बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे. या भेटीनंतर, महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शरद पवार गटातील अस्थिरता

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर, शरद पवार गटातील आमदार आणि खासदारांमध्ये अस्थिरता सुरू झाल्याचे समजते. ४ डिसेंबरला दिल्लीत शरद पवार गटाच्या खासदारांची महत्त्वाची बैठक झाली होती. या बैठकीत सत्तेत जाण्याची इच्छा व्यक्त झाली होती. मात्र, या गटात याबद्दल दोन मतप्रवाह दिसून आले आहेत. एका गटाचे मत आहे की, शरद पवार गटाने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून भाजपसोबत सत्तेत साम ील व्हावे. दुसरा गट अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होण्याच्या बाजूने आहे. मात्र, बहुतांश आमदार आणि खासदार हे सत्तेत सामील होण्याच्या बाजूने दिसत आहेत. त्यामुळे राज्यातील महाविकास आघाडीचे अस्तित्व संपण्याची शक्यता आहे.

दिल्लीतील बैठकीचे महत्त्व

सूत्रांच्या माहितीनुसार, अदानी यांच्या घरी झालेल्या बैठकीत भाजपच्या केंद्रीय नेत्याने शरद पवार यांच्या गटातील नेत्याकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि आगामी काळातील शरद पवार गटाची भूमिका याबद्दल चर्चा केली. उभय नेत्यांमध्ये बराच काळ चर्चा झाली. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार गटाचा खासदार अजितदादा गटात सामील होतील, अशी चर्चा सुरू होती. या चर्चेचे मूळ आणि पडद्यामागील घडामोडी आता एक-एक करून समोर येत आहेत.

काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाची प्रतिक्रिया

शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यास, काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाची प्रतिक्रिया काय असेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शरद पवार भाजपसोबत सत्तेत सामील झाल्यास, महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही तासांमध्ये काय घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

संभाव्य बदल आणि आव्हाने

शरद पवार गट आणि भाजपमधील बोलणी दिल्लीत सुरू आहेत. अदानी यांच्या घरी झालेल्या बैठकीत, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि शरद पवार गटाच्या भविष्यातील भूमिकेबद्दल चर्चा झाली. जर शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला, तर राज्यातील महाविकास आघाडीचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. तसेच, काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाची प्रतिक्रिया महत्त्वाची ठरेल. शरद पवार यांनी भाजपसोबत सत्तेत सामील झाल्यास, महाराष्ट्राच्या राजकारणाची रचना पुन्हा एकदा बदलू शकते. त्यामुळे पुढील काही तासांमध्ये काय घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शरद पवार यांचा भाजपसोबतचा संभाव्य युती हा महाराष्ट्राच्या राजकीय भविष्यासाठी निर्णायक ठरू शकतो. विरोधी पक्षांनी या संभाव्य युतीविरोधात कसे पाऊल उचलावे, यावर विचारमंथन सुरू झाले आहे.

वेध गावपळणीचे : आचरा वासिय गुंतले वेशीबाहेर राहुट्या उभारण्यात

गावपळणीचे दिवस जवळ आल्याने गावच्या वेशीबाहेर वस्ती साठी निवारा उभारण्यासाठी सध्या ग्रामस्थ गुंतले आहेत. रविवार १५डिसेंबरला दुपारी दोन नंतर इशारा होताच गावपळणीला सुरुवात होणार आहे आणि बघता बघता गाव निर्मनुष्य होणार आहे.पुढील तीन दिवस आणि तीन रात्री गडबड वाढणार आहे ती वेशीबाहेर.सुमारे आठ हजाराच्या वर वस्ती असलेले आचरा गाव गावपळणीसाठी निर्मनुष्य होणार आहे. गावपळणीत गावच वेशीबाहेर जाणार असल्याने वेशीबाहेर राहण्यासाठी राहुट्या उभारण्याची गडबड सुरु झाली आहे.

पारवाडी खाडी किनारी, भगवंतगड माळ रानावर, वायंगणी, आडबंदर आदीभागात ग्रामस्थ राहुट्या उभारुन निवारा बनविण्यात मग्न झाले आहेत. यासाठी चिव्याच्या काठ्या,जंगली वासे याबरोबरच आधुनिक साधनांचाही वापर केला जात असल्याचे पारवाडी ग्रामस्थ पपी पारकर नारायण धुरी सांगतात. काही ठिकाणी संपूर्ण चिव्याच्या काठ्या वापरुन माडापासून बनविलेल्या झापांचा आधार घेत तर काहींनी ताडपत्रीचा वापर करुन निवारयासाठी राहुट्या उभारल्या आहेत. कष्टाच्या गोष्टी असूनही सर्व जण गावपळणीच्या आनंदाचा उत्साह अंगात संचारल्याप्रमाणे झपाटल्यासारखे आनंद घेत काम करत आहेत. यासाठी चाकरमानीही दाखल झाले आहेत. याबाबत मुंबई येथून आलेले पपी पारकर सांगतात. गावपळणीचे वर्ष आले की देव दिवाळीला गावपळणीचा कौल होतो का याकडे आम्हा चाकरमान्यांचे लक्ष लागलेले असते.तो झाला की आमच्या अंगात वेगळीच उर्जा निर्माण होते आणि कधी एकदा गावात जाऊन गावपळणीची तयारी करतो असे होते. आता आम्ही राहुट्या उभारताना मच्छर मुंग्यांचा त्रास होतो. मात्र गावपळणी मध्ये आम्हाला ना मच्छरचा त्रास ना इतर जिवाणूंचा असे पारकर सांगतात.

पारवाडी येथिल अनेक गावपळणीचा अनुभव घेतलेले जेष्ठ नागरिक नारायण धुरी सांगतात गावपळण म्हणजे आमच्या साठी आनंदच असतो.पुन्हा एकदा तरुण झाल्यासारखे वाटते. तर देवूळवाडी येथील चंदू आडवलकर सांगतात गावपळणीत वेशीबाहेर राहुट्या उभारुन राहण्यात वेगळीच मजा असते. सर्व जण आपला त्रास, राग वैर विसरून एकत्र रममाण होत असतो.

दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग) : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : ॲड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, कोपार्डे, जि.कोल्हापूर महाराष्ट्र-४१६२०४, येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

हायस्पीड ट्रॉलर्सची घुसखोरी तात्काळ बंद करा, अन्यथा गिलनेट मासेमारी बंद होईल

म्हाकले, सर्जा बटा, सुकृत बटा आदी व इतर मच्छिमार उपस्थित होते. तसेच सहायक मत्स्य व्यवसाय आयुक्त सागर कुसवेकर, मत्स्य अधिकारी तेजस्विता करंगुटकर, पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेचे श्री. बहार, परवाना अधिकारी श्री. अलगिरी व इतर उपस्थित होते. यावेळी मच्छिमारांनी निवेदन सादर केले. सिंधुदुर्ग रत्नागिरी मध्ये पारंपारीक पद्धतीने गिलनेटची मासेमारी होते. संध्याकाळी ६ ते दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजेपर्यंत चालणाऱ्या या मासेमारीत प्रत्येक नौका मालकाची जाळी सहा तास समुद्रात टाकलेली असतात. या सहा तासामध्ये प्रत्येक नौका मालकाची ३० ते ३५ जाळी पाण्यामध्ये मासेमारीसाठी असतात. असे असताना गेली तीन वर्षे परराज्यातील सुमारे २५० ते ३०० हायस्पीड ट्रॉलर्स या समुद्रात मासेमारी करत असून आता हे हायस्पीड ट्रॉलर्स किनाऱ्यालगत ५ ते ६ वाव मध्ये मासेमारी करत असल्याने गिलनेट मासेमारी बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. साधारणपणे आठवड्याभरात प्रत्येक नौका मालकाचे हजारो रुपयांचे नुकसान होत आहे. याबाबत वेळोवेळी मत्स्य व्यवसाय खात्यास कल्पना देवून सुद्धा अद्याप पर्यंत कोणतीही ठोस कारवाई होत नाही, अशी व्यथा यावेळी वेंगुर्ला येथील मच्छिमारांनी निवेदनातून मांडली.

तसेच घुसखोरी करणारे ट्रॉलर्स हे जास्त करून गोवा आणि कर्नाटक राज्यातील आहेत. त्यामुळे गोवा सरकार व मत्स्य कार्यालयाशी समन्वय करावा, रेडी बंदरातून गस्त करावी, गोवा महाराष्ट्रची संयुक्त बैठक आयोजित करावी, कर्नाटक राज्याशी संपर्क करून तेथील हायस्पीड ट्रॉलर्सचें परतावे रद्द व निलंबीत करण्याबाबत मागणी करावी, सहकारी संस्थे मार्फत तुटलेल्या जाळ्यांची माहिती कार्यालयात कळविणे, परप्रांतीय नौकांवर कारवाई करण्यात यावी, अशा मागण्या मच्छिमारांनी केल्या. तसेच कारवाई बाबत मत्स्य अधिकाऱ्यांवर कोणत्याही पक्षाचा दबाव आणला जात असेल तर तेव्हा आम्हाला कळवावे, आम्ही बाकीचे बघू, आम्हाला मच्छिमार समाज प्रथम असून नंतर राजकारण, असेही यावेळी उपस्थित मच्छिमारांनी सांगितले.

यावेळी सहाय्यक मत्स्य आयुक्त श्री. कुवेसकर यांनी महाराष्ट्र राज्याच्या प्रवेशद्वार असलेल्या रेडी बंदरात गस्ती नौका उपलब्ध करून परप्रांतीय आक्रमणाला आळा घालण्याचे आश्वासन दिले. तसेच यावेळी झालेल्या चर्चेत गोवा मत्स्य व्यवसाय विभाग यांच्याशी संपर्क साधून संयुक्त कारवाईबाबत शक्यातेबाबत चर्चा झाली. तसेच कर्नाटक सरकारकडे या घुसखोरीबद्दल तक्रार करणार असल्याचे सांगण्यात आले.

विनायक राऊतांची याचिका फेटाळण्यासाठी नारायण राणेंचा कोर्टात अर्ज

केव्हा घडले याची तारीख आणि ठिकाण यासह संपूर्ण माहिती द्यावी लागते, असे नारायण राणे यांच्या याचिकेत म्हटलं आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातील निकाल रद्दबातल ठरवून नव्याने निवडणुका घ्याव्यात, अशी याचिका विनायक राऊत यांनी केली होती. राऊत यांच्या याचिकेत रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा जागेसाठी पुन्हा निवडणुका घेण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाला निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच नारायण राणे यांची खासदारकी रद्द करण्याचीही मागणी करण्यात आली. या याचिकेत आदर्श आचारसंहिता आणि लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन झालं असून महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने कोणतीही कारवाई केली नसल्याचेही म्हटलं होतं. तसेच नारायण राणेंचे सुपुत्र आणि आमदार नितेश राणे यांनी जाहीर सभा घेऊन धमकावले. जर तुम्ही नारायण राणे यांना मतदान केलं नाही, त्यांना लीड दिलं नाही तर आमच्याकडे निधी मागायला यायचं नाही, असं नितेश राणे यांनी मतदारांना धमकावलं, असा उल्लेखही विनायक राऊत यांनी याचिकेत केला होता. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने नारायण राणे यांना समन्स बजावलं होतं.

खारेपाटण येथे मोटरसायकल व कंटेनर मध्ये अपघात

जात असल्याने कणवलीच्या दिशेने आलेला व मुंबईच्या दिशेने जाणारा कंटेनर वाहन क्र.एम एच ४६ सी एल ३१५८ यांची समोरासमोर धडक होऊन मोटार सायकलस्वार सचिन लाड जागीच ठार झाला.तर त्याच्या सोबत असलेला तानाजी शेळकर हा गंभीर जखमी झाला आहे.त्याला १०८ वाहनाने पुढील उपचारासाठी खारेपाटण प्रा.आ.केंद्रात त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच खारेपाटण पोलीस अंमलदार माने व मोहिते हे घटनास्थळी दाखल झाले. तर कणकवली पोलीस निरीक्षक मुंडे पोलीस हेड कॉन्स्टेबल देसाई यांनी खारेपाटण येथे अपघात स्थळी तातडीने भेट देऊन अपघाताची माहिती जाणून घेतली.अधिक तपास खारेपाटण पोलीस करत आहेत.

डोकीवर दगड मारून दुखापत केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

अशी विचारणा केली होती. या रागातून रीमेश चव्हाण यांने फिर्यादी प्रकाशाला तू ही बाब वैभव मालंडकर याला का सांगितली अशी विचारणा करत तुझी मागची लफडी भरपूर आहेत असे म्हणत रीमेश चव्हाण व वैभव मालंडकर या दोघांनी प्रकाश याना पाठीमागून पकडत त्यांच्यासोबत असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने पाठीमागून डोकीवर दगड मारल्याची फिर्याद प्रकाश शिंदे यांनी दिली आहे. व परत भानगडी केल्यास तुला ठार मारून टाकू अशी देखील धमकी दिल्याचे या फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीनुसार ३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास कणकवली पोलीस करत आहेत.

कर्नाटक ट्रॉलर्सची घुसखोरी कायम ! रविकिरण तोरसकर यांचा आंदोलनाचा इशारा

दिवसांमध्ये सदर गोष्टींची पूर्तता करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन नारायण राणे यांना दिले होते. परंतु दिनांक २६/१०/२०२४ पासून आज तगयत म्हणजेच गेल्या दीड महिन्यामध्ये मत्स्य व्यवसाय खात्याने संबंधित विषयात कोणतीही पावले उचलली नाहीत असे निदर्शनास येत आहे. त्यामुळे परप्रांतीय विषेतः कर्नाटक येथील हायस्पीड ट्रॉलर ची बेकायदेशीर मासेमारी सुरू आहे. त्यामुळे सागरी जैवविविधता व स्थानिक मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर विषयात मत्स्यव्यवसाय विभागाने वरील दोन गोष्टींची पूर्तता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत न केल्यास प्रशासनाला जाग आणण्यासाठी दि ०१ जानेवारी २०२५ पासून जिल्ह्यातील व राज्यातील विविध मच्छीमार संघटना ना सोबत घेऊन बेमुदत धरणे आंदोलन मत्स्य कार्यालय ,मालवण येथे करण्यात येईल. तसेच गरज पडल्यास सदर आंदोलनाचे बेमुदत उपोषण आंदोलनात रूपांतर करण्यात येईल. तरी मत्स्यव्यवसाय विभागाने कार्यालयाने सदर विषयात तातडीची पावले उचलावीत असा इशारा श्री. तोरसकर यांनी दिला आहे.

ग्राम ऊर्जा स्वराज राष्ट्रीय पुरस्काराबद्दल मान्याचीवाडीचे महावितरणतर्फे अभिनंदन

मुंबई । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कार सोहळ्यात सातारा जिल्ह्यातील मान्याची वाडी गावाला ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कार मिळाल्याबद्दल गावाचे सरपंच रविंद्र माने यांचे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थाकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी अभिनंदन केले.

नवी दिल्ली येथे बुधवार दि. ११ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सरपंच रविंद्र माने यांनी हा पुरस्कार व एक कोटी रुपयांचा निधी स्वीकारला. देशभरातील १ लाख ९४ हजार ग्राम पंचायतींनी केंद्र सरकारच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ४५ ग्रामपंचायतींची पुरस्कारांच्या विविध वर्गवारीसाठी निवड करण्यात आली. शाश्वत विकास ध्येय (एसडीजी) स्थानिक पातळीवर गाठण्यासाठी केलेल्या कामगिरीचा पुरस्कारासाठी विचार करण्यात आला. राज्यातील पहिले सौर ग्राम ठरलेल्या मान्याचीवाडीमध्ये विजेची संपूर्ण गरज सौर ऊर्जेद्वारे अर्थात हरित ऊर्जेद्वारे भागवली जाते.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी हे गाव राज्यातील पहिले सौरग्राम आहे. गावातील घरांची तसेच ग्राम पंचायत कार्यालय, शाळा, पथदिवे, पाणी पुरवठा योजना इत्यादींची विजेची गरज गावातच सौरऊर्जा निर्मिती करून भागविली जाते. मान्याचीवाडीतील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण ऑगस्ट महिन्यात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते.

महावितरणने राज्यात शंभर गावे सौर ग्राम करण्याची मोहीम हाती घेतली असून तिचे काम चालू आहे.

यामध्ये गावातील सर्व घरांवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्या घरांना वीज पुरवठा केला जाईल. त्यासोबत गावातील ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, रस्त्यावरील दिवे, पाणी पुरवठा यासाठीचा वीजपुरवठाही सौरऊर्जेद्वारे केला जाईल. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत घरावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या वीज ग्राहकांना तीन किलोवॅट क्षमतेपर्यंत ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. यामुळे घरगुती ग्राहकांना छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविणे सुलभ होते.

यामध्ये घराच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यामुळे ग्राहकांचे वीजबिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळते. सौर ग्राम योजनेत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसोबत अन्य सरकारी योजनांचा व उपलब्ध निधीचा कल्पकतेने वापर केला जातो. मान्याचीवाडी पाठोपाठ पुणे जिल्ह्यातील टेकवडी हे राज्यातील दुसरे सौरग्राम ठरले आहे. या गावातही सर्व घरांना सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा होतो.

या गावाच्या सौर ऊर्जीकरण प्रकल्पाचे उद्घाटन तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी ऑक्टोबर महिन्यात ऑनलाईन पद्धतीने केले होते. राज्यात प्रधान मंत्री सूर्यघर म ोफत वीज योजनेत आतापर्यंत ७३,७९० घरांच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यात आले आहेत. त्यांची एकत्रित क्षम ता २९२ मेगावॅट असून ५९२ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.

परभणी शहरात तणावपूर्ण शांतता तोडफोडीनंतर ५० जण ताब्यात

पान १ वरून..

आगी लावण्यात आल्या होत्या. दुकानांच्या पाट्या, काचांची तोडफोड झाली. विसावा चौक आणि स्टेशन रोड भागात अनेक दुकाने पेटविण्यात आली. यामुळे व्यापारी, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अष्टभुजा चौक आणि विसावा कॉर्नर परिसरात जमावाने पोलिसांवर दगडफेक केली त्यात काही पोलिस कर्मचारी जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. परिणामी, जमाव काहीसा पांगला पण तोडफोडीच्या घटना इतर भागांत सुरूच राहिल्या. काही आंदोलक महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रवेश करून तेथील काचा फोडल्या. कार्यालयातील खुर्च्या व टेबलचीही मोडतोड करण्यात आली.

संतप्त जमावाने मंगळवारी सायंकाळी वसमत मार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) सात बसवर जोरदार दगड फेक केली. त्यात परभणीच्या सहा व नांदेड आगाराच्या एका बसचा समावेश होता. यात मोठे नुकसान झाल्याची माहिती परभणी आगारप्रमुख कळम पाटील यांनी दिली. या घटनांच्या पार्श्वभूमीवर काल सायंकाळपासून परभणी आगारातून एकही बस बाहेर पडलेली नाही. संपूर्ण एसटी वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी आजही रात्री उशिरापर्यंत एकही बस न सोडण्याचा निर्णय घेतला त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. पोलिसांच्या दृष्टीनं ही परिस्थिती हाताळण्यासाठी विलंब झालेला दिसतो. वेगवेगळ्या ठिकाणी घटना झाल्यामुळं अडचण आली होती. याबाबत आम्ही चौकशी करणार आहोत. सोशल मीडियावरून मिळणारे व्हिडिओ, शहरातील सीसीटीव्ही तपासून कारवाई केली जाणार असल्याचं यावेळी पोलीस महानिरिक्षकांनी सांगितलं.

परभणीतील घटनेचे जिल्ह्यात पडसाद उमटले. परभणी तालुका, सेलू, गंगाखेड, पूर्णा, पालम, जिंतूर, मानवत, सोनपेठ, पाथरी तालुक्यांमध्ये आज कडकडीत बंद पाळण्यात आला. व्यापाऱ्यांनी स्वतःहून दुकाने बंद ठेवली. काही तालुक्यांमध्ये आज असलेला आठवडे बाजार भरला नाही. जिंतूरमध्ये एका बसवर आंदोलकांनी दगडफेक केली.या तालुक्यातील भोगावमध्ये एका किराणा दुकानावर दगडफेक झाली. सोनपेठमध्ये गुरुवारीही 'बंद'चे आवाहन करण्यात आले होते. हिंगोलीतही बंद पुकारण्यात आला. व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली. काही भागात मात्र व्यवहार सुरळीतपणे सुरू होते. हिंगोलीतून परभणीला जाणाऱ्या बस बंद ठेवण्यात आल्या होत्या. अन्य ठिकाणांहून आलेल्या बस येथील स्थानकात थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. दरम्यान, भोकर, लोहा (जि. नांदेड), मंठा (जि.जालन) येथे घटनेचा निषेध करण्यात आला. जालन्याहून परभणीकडे जाणाऱ्या बसच्या आठ फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या.

सीएसटी ते करमळी स्पेशल रेल्वेला वैभववाडी आणि सावंतवाडी मिळाला थांबा

कणकवली । प्रतिनिधी

०११५१/०११५२ सीएसटी ते गोवा करमळी अशा धावणाऱ्या हिवाळी विशेष रेल्वे गाडीला आमदार नितेश राणे यांच्या मागणीची दखल घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी रोड आणि सावंतवाडी रोड येथे थांबे देण्यात आले आहेत.

आमदार नितेश राणे यांनी रेल्वे मंत्रालय आणि रेल्वे प्रशासनाकडे याबाबतचा पत्रव्यवहार करून तातडीने हे थांबे मंजूर केले जावेत अशी विनंती केली होती आणि या विनंतीला मान देऊन प्रशासनाने वैभववाडी आणि सावंतवाडी या दोन्ही रेल्वे स्थानकावर ही गाडी जाता येता थांबवण्याचे आदेश जारी केले आहेत. रेल्वेच्या या निर्णयामुळे आमदार नितेश राणे यांनी रेल्वेमंत्री तसेच रेल्वे प्रशासन यांचे आभार व्यक्त केले आहेत.

याबाबत कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार मुंबई ते गोव्यातील करमळी दरम्यान दररोज चालवण्यात येणाऱ्या विशेष गाडीला सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैभववाडी आणि सावंतवाडी स्थानकांवर अतिरिक्त थांबे मंजूर केले आहेत, असे जाहीर केले आहेत.

हिवाळी हंगामात सीएसटी ते करमळी अशी गाडी कोकण रेल्वे मार्गावरून धावते या गाडीला सावंतवाडी आणि वैभववाडी या दोन महत्त्वाच्या तालुक्यात थांबा मिळाला असल्यामुळे प्रवाशांम धून समाधान व्यक्त केले जात आहे तसेच आमदार नितेश राणे यांनी हे थांबे मिळावेत म्हणून केलेल्या प्रयत्नाबद्दल जनतेतून आभारही व्यक्त केले जात आहे.

मोती तलावातील मृतदेहाची ओळख पटली

पान १ वरून..

सचिन पाटकर यांनी मृतदेह पाहून तो आपलाच भाऊ असल्याची ओळख पटवली यानंतर पोलिसांनी रितसर पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालयात हलविला. राजेश पाटकर हा आपल्या कुटुंबासह कुडाळ तालुक्यातील पिंगुळी येथे गेली सात आठ वर्ष भाड्याने राहत होता.

त्याचा स्वतःचा डंपर व्यवसाय होता वाळू चिरे,खडी सप्लायर च्या माध्यमातून तो आपला उदरनिर्वाह करत होता. अधून मधून तो सावंतवाडीत मुळ घरी येऊन जाऊन होता. बुधवारी सायंकाळी तो सावंतवाडीत घरी आला होता. सायंकाळी सात वाजता कुडाळ येते जातो असे सांगुन तो निघाला होता. असे सचिन यांनी पोलिसांना दिलेल्या माहिती सांगितले. सावंतवाडी तलावाच्या काठीही त्याला बुधवारी रात्री नागरिकांनी पाहिले होते. एकूणच तो तलावा काठी बसला असताना तोल जाऊन खाली पडल्याने त्याचा बुडून हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचे प्रथम दर्शनी तपासात पुढे येत आहे असे पोलिसांचे म्हणणे आहे. या संदर्भात भाऊ सचिन पाटकर यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर यासंदर्भात योग्य तपास करावा अशी मागणी भाऊ सचिन पाटकर यांनी केली आहे.

जिल्हा बँकेच्या ओरोस कार्यालया समोर उपोषण छेडणार !

पान १ वरून..

हा ३ लाख रूपयांची उलाढाल आहे. मात्र त्या शिवसेना पक्षाचे काम करतात म्हणून त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. नाईक म्हणाले, जिल्हा बँकेच्या कार्यकारी मंडळाची नुकतीच सभा झाली.

यात आयत्या वेळेच्या विषयामध्ये पिग्मी एजंट सायली घाडी यांना काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. हा सर्व प्रकार म्हणजे सुडाचे राजकारण आहे. जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्याने जर भाजप पक्षाचे काम केले नाही तर त्यांना थेट बाहेरचा रस्ता दाखवला जाणार असाच संदेश यातून दिला जात आहे. किंबहुना जिल्हा बँकेतील कर्मचाऱ्यांना, लाभार्थींना विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप पक्षप्रवेश करण्यासाठी दबाव देखील आणण्यात आला होता.

नाईक म्हणाले, सहकार महर्षी शिवरामभाऊ जाधव यांनी जिल्हा बँकेचे रोपटे लावले. त्यांनी कधीच आकसाने कारवाई केली नाही. मात्र जिल्हा बँकेचे तज्ञ संचालक आमदार नितेश राणे यांच्या सूचनेनुसार सायली घाडी याना पिग्मी एजंट पदावरून काढून टाकण्यात आले आहे.

एकीकडे लाडक्या बहिणींना राज्य सरकार दरमहा रक्कम देत असताना सिंधुदुर्गात मात्र आमदार नितेश राणे हे राजकीय आकसाने जिल्हा बँक कर्मचाऱ्यांवर कारवाई करत आहेत. याविरोधात सोमवारी १६ डिसेंबरला आपण एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहोत. तसेच घाडी यांना पुन्हा सेवेत न घेतल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडले जाणार आहे.

गणपतीपुळे किनारी होणार कासवांचे संवर्धन

रत्नागिरी । प्रतिनिधी

गणपतीपुळे येथील किनाऱ्यावर सागरी कासवांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे काम कांदळवन विभागाच्या वतीने हाती घेण्यात आले आहे. श्री गणेश मंदिराच्या नजीकच कासवांच्या अंड्यांसाठी संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १६ किनार्यांवर सागरी संरक्षण व संवर्धन हा उपक्रम कांदळवन विभागाच्या वतीने हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमासाठी कासवमित्रांची निवड करण्यात आली असून, गणपतीपुळेसाठी ऋषीकेश जोशी कासवमित्र म्हणून काम करणार आहेत. मालगुंडसाठी आदित्य मयेकर कासवमित्र म्हणून काम करणार आहेत. यापूर्वी हे काम वनविभागाच्या प्रादेशिक विभागाकडे होते; मात्र, त्यानंतर आता सागरी कासवांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे काम कांदळवन विभागाकडे देण्यात आले आहे.

कुडाळ नगरपंचायत, कुडाळ
जाहीर निविदा सुचना

कुडाळ नगरपंचायतीस आवश्यक असलेल्या खालील कामासाठी निविदा मागविणेत येत आहे.

कामाचा तपशिल

अ.क्र.	कामाचा तपशिल	अंदाजपत्रकीय रक्कम (सर्व करासहित)	निविदा किंमत	बयाणा रक्कम	सुरक्षा अनामत	कामाची मुदत
१	कुडाळ नगरपंचायत हद्दीतील विठ्ठलवाडी येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	७,६०,२४६/-	१०००/-	१५२०५/-	१०% (बिलातून ८%+२%बयाणा)	६० दिवस

निविदा सुचनेच्या अटी व शर्ती

१. कोरे निविदा फॉर्म मिळण्याचा दिनांक १३/१२/२०२४ ते दिनांक २३/१२/२०२४ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत कुडाळ नगरपंचायत कार्यालयात आवक-जावक विभागाकडे सुट्टीचे दिवस वगळून रोख निविदा फॉर्म फी जमा केल्यावर मिळतील.

२. निविदा फॉर्म सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक ३०/१२/२०२४ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत आवक-जावक लिपिक यांचेकडे सादर करावी.

३. शक्य झाल्यास निविदा दिनांक ३०/१२/२०२४ रोजी सायं. ५.१० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यात येईल.

४. कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अगर मंजूर करण्याचा अधिकार कुडाळ नगरपंचायत यांनी राखुन ठेवलेला आहे.

५. कामाच्या इतर शर्ती व अटी बाबतची सविस्तर माहिती नगरपंचायत कार्यालयात पाणीपुरवठा विभाग यांचेकडून घ्यावयाची आहे.

जा.क्र.३०७४ सन २०२४-२५
कुडाळ नगरपंचायत, कुडाळ
दिनांकः १२/१२/२०२४
निविदा क्रमांक : - /२०२४-२५

सही/- **मुख्याधिकारी**
कुडाळ नगरपंचायत

थोडक्यात

नगरसेवक उदय मांजरेकर यांची बिनविरोध निवड

कुडाळ । प्रतिनिधी

नगरसेवक उदय मांजरेकर यांची कुडाळ नगरपंचायत बांधकाम व पर्यटन सभापती पदी बिनविरोध निवड झाली आहे. निवडणूक अधिकारी तथा प्रांताधिकारी ऐश्वर्या काळुसे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली आहे. यावेळी नगराध्यक्ष अक्षता खटावकर यांनी पुष्पगुच्छ देऊन उदय मांजरेकर यांचे अभिनंदन केले. यावेळी उपनगराध्यक्ष किरण शिंदे, आरोग्य व स्वच्छता सभापती मंदार शिरसाट, नगरसेविका श्रेया गावंडे, नगरसेविका सई काळप, नगरसेविका ज्योती जळवी, नगरसेविका आफ्रीन करोल, नगरसेविका श्रुतीवर्धन आदी उपस्थित होते.

श्री देवी माऊलीचा वार्षिक जत्रोत्सव

सावंतवाडी । प्रतिनिधी

इन्सुली गावचे ग्रामदैवत श्री देवी माऊलीचा वार्षिक जत्रोत्सव मंगळवारी १७ डिसेंबर रोजी होणार आहे. या निमित्ताने मंगळवारी दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. सकाळी विधिवत पुजा, त्यानंतर ओटी भरणे, नवस बोलणे, नवस फेडणे तसेच रात्री पालखी फेरी व त्यानंतर कलेश्वर दशावतार नाट्य मंडळ यांचा दशावतार नाट्य प्रयोग होणार आहे. तसेच दुपारी १२ वाजता श्री देवी माऊली दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. जत्रोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन इन्सुली ग्रामस्थ, श्री देवी माऊली देवस्थान समिती व मानकरी यांनी केले आहे.

मारुती मंदिर येथे पेट्रोल टँकरने घेतला पेट

रत्नागिरी । प्रतिनिधी

शहरातील मारुती मंदिर येथे मोठा अपघात होता होता टळला आहे. पेट्रोल वाहतूक करणाऱ्या एका टँकरच्या चाकाला अचानक आग लागली. ही घटना लक्षात येताच तत्काळ अग्निशामन यंत्रणेला बोलवण्यात आलं. या टँकरचे ब्रेक लाइनर प्रचंड गरम होऊन टायरने पेट घेतल्याची घटना घडली. अग्निशमन यंत्रणा त्वरित पोचल्याने मोठा अनर्थ टळला. आज रात्री नऊच्या सुमारास ही घटना घडली आहे.

सार्वजनिक ठिकाणी मद्यपान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

रत्नागिरी । प्रतिनिधी

शहरानजीकच्या एम आयडीसी फिनोलेक्स कॉलनी येथे सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्या एकाविरोधात ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई मंगळवार १० डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजता करण्यात आली. अक्षय अजय भाटकर (२६, रा. मिऱ्या भाटकरवाडी, रत्नागिरी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्या विरोधात पोलिस कर्मचारी रुपेश भिसे यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, मंगळवारी रात्री अक्षय भाटकर फिनोलेक्स कॉलनीच्या मागील मोकळ्या जागेत झाडीच्या आडोशाला त्याच्याकडे दारु पिण्याचा कोणताही परवाना नसताना दारु पित असताना मिळून आला. त्याच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रिफायनरी प्रकल्पाला भाजपचे समर्थन; महायुतीमध्ये ठरणार कळीचा मुद्दा

राजापूर । प्रतिनिधी

संपूर्ण कोकणचे लक्ष लागून राहिलेला राजापूर तालुक्यातील रिफायनरी प्रकल्पाचा मुद्दा आम च्या दृष्टीने संपला आहे, असे वक्तव्य स्थानिक आमदार किरण सामंत करत असताना दुसरीकडे भाजपचे नेते माजी आमदार प्रमोद जठार हे रिफायनरी समर्थकांची बैठक घेत आहेत. या पार्श्वभूमीवर आ. किरण सामंत काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, एकीकडे प्रकल्पाचे भाजपकडून होणारे समर्थन आणि दुसरीकडे महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार हा विषय संपल्याचे सांगत आहेत. त्यामुळे येत्या काळात हा विषय महायुतीमध्ये कळीचा मुद्दा ठरणार असल्याची शक्यता आहे.

राजापूर तालुक्यातील नाणार परिसरात प्रस्तावित असलेला रिफायनरी प्रकल्प गेली काही वर्षे कोकणात राजकीयदृष्ट्या संवेदनशील राहिला आहे. तब्बल ४ लाख कोटींची गुंतवणूक होऊ शकणारा ग्रीन रिफायनरी हा प्रकल्प राजापूर तालुक्यात करणार असे भाजपचे काही नेते सांगत आहेत, तर दुसरीकडे शिवसेनेकडून या प्रकल्पाला विरोध करण्याची भूमिका सातत्याने मांडण्यात आली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यानंतर शिवसेनेचे विभाजन झाल्यानंतरही ठाकरेंची शिवसेना आणि शिंदेंच्या शिवसेनेकडूनही प्रकल्प विरोधी भूमिका कायम ठेवण्यात आली आहे. मात्र शिंदेंची शिवसेना सहभागी असलेल्या महायुतीतील घटक पक्ष भाजपकडून या प्रकल्पाचे समर्थन होताना दिसत आहे. माजी आमदार प्रमोद जठार यांनी सातत्याने प्रकल्पाच्या समर्थनार्थ आपली भूमिका मांडल्याचे दिसून येते. मागील अनेक निवडणुकांमध्ये राजापूर तालुक्यामध्ये रिफायनरी हा प्रचाराचा प्रमुख मुद्दा राहिला आहे. स्थानिक जनभावना विचारात घेऊन शिवसेनेने प्रकल्पग्रस्तांसोबत राहण्याची भूमिका सातत्याने ठेवण्यात आली आहे. राजापूरचे माजी आमदार राजन साळवी यांनीही प्रकल्प विरोधी लढ्यामध्ये सातत्याने सहभाग घेतला आहे. परिणाम म्हणून गेल्या अनेक निवडणुकांमध्ये या भागातील मतदारांनी शिवसेनेला पाठबळ दिल्याचे दिसून येते. रिफायनरी हा विषय संपल्याचे आमदार सामंत सांगत असले तरी हा विषय महायुतीच्या दृष्टीने संपला आहे का? महायुतीतील सहकारी पक्ष भाजपच्या दृष्टीने संपला आहे का? हे सुद्धा आमदार सामंत यांनी सांगणे आवश्यक आहे.

कारण आमदार सामंत हे विधानसभा निवडणुकीमध्ये महा युतीचे उमेदवार म्हणून लढले होते, त्यामुळे त्यांना आता महायुतीचा प्रतिनिधी म्हणून रिफायनरी प्रकल्पाविषयीची स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक आहे. महायुतीची भूमिका वेगळी आणि स्थानिक आमदार म्हणून भूमिका वेगळी असे केल्यास ते केवळ राजापूरमधील स्थानिक नागरिकांची दिशाभूल केल्यासारखेच होणार आहे. मे महिन्यामध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये राजापूर विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार विनायक राऊत यांना सुमारे २३००० चे मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही येथील मतदार हे महाविकास आघाडीच्या मागे उभे राहणार असे चित्र होते. मात्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राजापूर तालुक्याम धून महायुतीचे उमेदवार किरण सामंत यांना सुमारे ८००० चे मताधिक्य मिळाल्याचे दिसून आले.

रिफायनरी प्रकल्पामुळे चर्चेत आलेल्या देवाचे गोठणे या गणातही किरण सामंत यांना म ताधिक्य मिळाले आहे. रिफायनरी प्रकल्प विरोधी असणाऱ्या मतदारांकडूनही किरण सामंत यांना पाठिंबा मिळाला असल्याचे दिसून येते, त्यामुळे रिफायनरी प्रकल्प विषय स्थानिक आमदार म्हणून किरण सामंत यांना स्पष्ट भूमिका घ्यावी लागणार आहे. रिफायनरी विरोधकांच्या बाजूने उभे राहायचे की सत्ताधारी म्हणून आणि भाजपचा सहकारी पक्ष म्हणून प्रकल्पाच्या समर्थनार्थ भूमिका घ्यायची की तटस्थ राहून स्थानिक नागरिकांना जे प्रकल्पाला विरोध करत आहेत आणि आपल्याला पाठिंबा दिला आहे त्यांना वार्यावर सोडायचे. हे येत्या काळात त्यांना स्पष्टपणे दाखवून द्यावे लागणार आहे.

रिफायनरी हा मुद्दा संपल्याचे सांगून त्यांना निश्चितच थांबता येणार नाही. कारण येत्या काळात जसजसे भाजपकडून या प्रकल्पाचे समर्थन वाढत जाईल तसतशी प्रकल्प विरोधकांची ही तीव्रता अधिक वाढणार आहे. स्थानिक नागरिकांचा विचार करून आमदार सामंत यांनी प्रकल्पविरोधी भूमिका घेतली तर ती भाजप आणि महायुतीच्या दृष्टीनेही डोकेदुखीची ठरणार आहे. प्रकल्प समर्थनाची भूमिका त्यांनी घेतली तर निवडणुकीत स्थानिकांनी दाखविलेल्या विश्वासाचे काय? हाही प्रश्न निर्माण होणार आहे. आमदार किरण सामंत हे कोकणातील मुरब्बी नेते म्हणून ओळखले जातात, त्यामुळे रिफायनरीच्या प्रकल्पाम ध्ये येत्या काळात ते कोणती भूमिका घेतात? याकडे संपूर्ण कोकणचे लक्ष लागून राहिले आहे.

थोडक्यात

प्रमोद जठार यांची राजापूर मतदारसंघात ढवळा ढवळ

राजापूर । प्रतिनिधी

प्रमोद जठार लांजा राजापूर मतदारसंघात ढवळा ढवळ करत असल्याचे दिसून येते. आज त्यांनी बारा वाजता रिफायनरी समर्थकांची बैठक बोलावल्याने एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान स्थानिक आमदार किरण सामंत यांना याबाबत कसलीच कल्पना न दिल्याने भाजप आणि शिवसेनेत वाद असल्याचे समोर होत स्पष्ट होत आहे.

प्रमोद जठार सिंधुदुर्ग जिल्ह्यातले असून सुद्धा ते राजापूर व लांजा मतदार संघात ढवळाढवळ करत असल्याचे दिसून येते.कारण रिफायनरी प्रकल्पाबाबत स्थानिक आमदार किरण सामंत निर्णय घेणार असताना प्रमोद जठार हे भाजपचे एक पदाधिकारी किंवा कार्यकर्ते असताना सुद्धा ते रिपाईनरी मध्ये जास्त इंटरेस्ट का घेत आहे त्याबद्दल उलट सुलट चर्चा सुरू होत आहे. दरम्यान रिफायनरी बाबत बोलताना आमदार किरण सामंत यांनी हा विषय संपला असल्याचेही सांगितले. असे असताना सुद्धा दोन्ही पक्षात समन्वय नसल्यामुळे रिफायनरी समर्थक आणि विरोधक अशी उभी भिंत कोणी तयार करत आहे का. असेही बोलले जात आहे त्यामुळे आज बारा वाजता भाजपचे माजी आमदार प्रमोद जठार यांनी रिफायनरी समर्थकांची बैठक बोलावली आहे त्यात काय ठरते हे पहावे लागणार आहे.

सिंधुदुर्ग महिला पोलीस तृप्ती मुळीक ला ३ दिवस पोलिस कोठडी

कोल्हापूर । प्रतिनिधी

गंगावेश परिसरात सुभाष हरी कुलकर्णी हे कुटुंबीय समवेत राहतात. फेब्रुवारी २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत करणी काढण्यासाठी विविध धार्मिक विधी करण्याच्या नावाखाली कुलकर्णी यांच्याकडून रोख रक्कम आणि दागिने अशी जवळपास ८४ लाख रुपयांची लूट एका भोंदू बाबाच्या टोळीनं केली होती. या प्रकरणी कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून मुख्य संशयित दादा पाटील महाराज यांच्यासह नऊ जणांविरोधात जुना राजवाडा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान यातील मुख्य संशयित पोलीस कॉन्स्टेबल तृप्ती मुळीक हिला जुना राजवाडा पोलिसांनी बुधवारी रात्री उशिरा सिंधुदुर्ग इथून ताब्यात घेतलं होतं. आज तृप्ती मुळीक हिला न्यायालयात हजर केलं असता न्यायालयानं तिला १४ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मुळदे येथे जिल्हास्तरीय खुली पुष्परचना स्पर्धा

कुडाळ । वार्ताहर

मुळदे येथील उद्यानविद्या महाविद्यालय येथे १२ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हास्तरीय खुली पुष्परचना स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि.०३ जाने. रोजी पार पडणार आहे. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक - ७,७७७/-रू. व्दितीय -५, ५५५/-रू, उत्तेजनार्थ क्र.१- २,५५५/- रू उत्तेजनार्थ क्र.२- २,५५५/- रू व विजेत्यांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. स्पर्धेचे नियमावली व अधिक माहितीसाठी प्रा.डॉ. संदीप गुरव मो.९४२३३०००४७ यांच्याशी संपर्क साधावा. इच्छुक स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन मा. सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पुण्यात १११ वर्षे जुनी, साडे तीन किलो सोन्याची श्री दत्त मूर्ती; दर्शनासाठी भाविकांची गर्दी

पुणे । प्रतिनिधी

सोनं हा सगळ्यात महागडा धातू समजला जातो, त्यामुळे सोन्याचा (ऱ्हेश्रव) वापर करुन मौल्यवान वस्तू बनवतात. अनेकदा सोन्याच्या कलाकारीत देवांच्याही मूर्ती घडवल्या जातात. अशीच एक तब्बल १११ वर्षे जुनी गोल्डन दत्त मूर्ती समोर आली आहे. पुण्यातील बाजीराव रस्त्यावरील बँक ऑफ महाराष्ट्रम ध्ये १११ वर्षे जुनी सोन्याच्या दत्ताची मूर्ती पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाल्याचं चित्र आहे. येथे १११ वर्षांपूर्वी कोलकत्तावरुन आलेल्या एका भक्ताने पुण्यातील (झींपश) श्री समर्थ सद्गुरु नारायण महाराज ट्रस्टला ही साडेतीन किलो सोन्याची दत्ताची मूर्ती भेट म्हणून दिली होती. मात्र, ही मूर्ती कुठेही बाहेर ठेवली तर ती तिच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण

होईल. त्यामुळे श्री सद्गुरु नारायण महाराज दत्त संस्थान ट्रस्टकडून ही मूर्ती गेले ६० वर्षांपासून बँक ऑफ महाराष्ट्राच्या लॉकरमध्ये ठेवण्यात आली आहे. दत्त जयंतीच्या निमित्ताने ही मूर्ती लॉकरमधून बाहेर काढण्यात आली असून भाविकांनी गोल्डन मूर्ती पाहणीसाठी व दर्शनासाठी गर्दी केली आहे.

बाजार भावानुसार सध्या सोनं ८० हजार रुपये तोळा म्हणजेच १० ग्रॅम सोन्याची किंमत ८० हजार असून १०० ग्रॅम सोन्याची किंमत ८ लाख रुपये होते. या बाजार मुल्यानुसार १ किलो सोन्याची किंमत ८० लाख रुपये होते. त्यामुळे, सोन्याच्या वस्तू किंवा मूर्तीचं संरक्षण ही मोठी जबाबदारी असते. म्हणूनच, त्यामुळे श्री सद्गुरु नारायण महाराज दत्त संस्थान ट्रस्टकडून ही साडे तीन किलो सोन्याची श्री दत्त यांची मूर्ती लॉकरमध्ये ठेवली जाते. दरवर्षी दत्त जयंतीच्या पूर्वी असलेल्या गुरुवारी ही मूर्ती याच बँकेमध्ये भाविकांच्या दर्शनासाठी ठेवली जाते. आज त्याच निमित्ताने लोकांनी या सुंदर दत्ताच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. इतर वेळेस बँकेत लोकांची गर्दी त्यांच्या व्यवहार किंवा पैसे काढण्यासाठी असते. मात्र, आजची ही गर्दी फक्त दत्त महाराजांच्या दर्शनासाठी होती.

किंमत ३ कोटींच्या घरात

या साडेतीन किलो सोन्याच्या दत्ताच्या मूर्तीची किंमत कोट्यावधी रुपये आहे. बाजार भावानुसार जवळपास २ कोटी ८० लाख रुपयांपर्यंत ही किंमत जाऊ शकते. त्यामुळे, या सोन्याच्या मूर्तीची विशेष सुरक्षा बाळगण्यात येते. श्री दत्त जयंतीच्या निमित्ताने वर्षातून फक्त एकच दिवस ही मूर्ती लोकांच्या दर्शनासाठी बाहेर काढली जाते. त्यानंतर, पुन्हा एकदा ती याच बँक ऑफ महाराष्ट्राच्या लॉकरम ध्ये ठेवलेली असते. त्यामुळे, वर्षातून एकदाच दर्शन देणाऱ्या दत्त महाराजांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची बँकेत गर्दी होते.

हेवाळे ग्रामस्थांचे दोडामार्ग पं. स. समोर उपोषण

दोडामार्ग । वार्ताहर

प्रधानमंत्री आवास योजनेच्या 'ड' यादी मध्ये नाव समाविष्ट करून घरकूल मंजूर करावे, या मागणीसाठी हेवाळे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील काही ग्रामस्थांनी दोडामार्ग पंचायत समिती कार्यालयासमोर बुधवारी बेमुदत उपोषणास सुरुवात केली. जो पर्यंत आमची मागणी पूर्ण होत नाही तो पर्यंत आमचे उपोषण सुरूच राहणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. सायंकाळी उशिरापर्यंत उपोषण सुरू होते.

हेवाळे येथील आर्थिक मागासवर्गीय ग्रामस्थांनी घरकूल मंजूर व्हावे, यासाठी २५ ऑगस्ट २०२३ रोजी आयनोडे-हेवाळे ग्रामपंचायत समोर उपोषण केले होते. तत्कालीन गटविकास अधिकारी श्री. जाधव यांनी उपोषणस्थळी भेट देत आर्थिक मागास असलेल्या गरजूंची नावे त्वरित 'ड' यादीत समाविष्ट होण्यासाठी समिती नेमण्याचे

लेखी आश्वासन त्यावेळी दिले होते. मात्र सव्वा वर्षाचा कालावधी उलटूनही पंचायत समिती कार्यालया मार्फत समिती नेमण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आर्थिक मागास गरजू ग्रामस्थांची राहती घरी मोडकळीस आलेली असून त्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. ही घरे कधीही पडून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्वरित समिती नेमावी व आर्थिक मागास ग्रामस्थांची नावे प्रधानमंत्री आवास योजनेच्या 'ड' यादीमध्ये समाविष्ट करावी, अशी मागणी उदय जाधव यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

मात्र यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने उदय जाधव, प्रेमानंद नार्वेकर, भरत गावडे, रुक्मिणी नाईक, शोभा नार्वेकर, दीपक जाधव यांनी बुधवारी येथील पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास सुरुवात केली.

आमच्या घरांची परिस्तिथी बघा. एकीकडे छप्पर मोडले आहे तर दुसरीकडे भिंतीना भेगा पडल्या आहेत. घरे कोसळून कधी मरण येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे मायबाप सरकारने जागे व्हावे, आम्हाला घरकूल मंजूर करावे व आमच्या जीविताचे रक्षण करावे.

हेवाळे गावातील आर्थिक मागास लाभार्थींची घरकूल यादी मंजूर झालेली आहे. त्या यादीत या उपोषणकर्त्यांची नावे समाविष्ट नाहीत. मात्र नवीन यादीत या उपोषणकर्त्यांची नावे समाविष्ट करण्यात येतील.

सावंतवाडी बुराणगल्लीत २ लाखांचा गुटखा जप्त

सावंतवाडी । प्रतिनिधी

सावंतवाडी शहरातील बुराण गल्ली परिसरात अनधिकृत गुटख्यावर धाड टाकत सुमारे २ लाख ८ हजार ३९० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग सिंधुदुर्गच्या पथकाने सावंतवाडी पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या प्रकरणी अब्दुल गनी शहा (४४, रा. बुराण गल्ली, सावंतवाडी) याला ताब्यात घेण्यात आले असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

सावंतवाडी शहरातील बुराण गल्ली भागात अनधिकृतपणे गुटखा साठा असल्याची गोपनीय माहिती सिंधुदुर्ग पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला प्राप्त झाली होती. या माहितीनुसार गुरुवारी सायंकाळी उशिरा त्या जागी धाड टाकत सुमारे दोन लाख किमतीचा अनधिकृत गुटखा जप्त करण्यात आला.

ही कारवाई गुन्हा अन्वेषण विभागाचे जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल तसेच अप्पर पोलीस अधीक्षक ऋषिकेश रावले, गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समीर भोसले, पोलीस उपनिरीक्षक सुधीर सावंत, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुरुनाथ कोयंडे, पोलीस हवालदार प्रकाश कदम, अनुप कुमार खंडे, चंद्रकांत पालकर यांच्या पथकाने केली. तर सावंतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अनिल धुरी, महेश जाधव, हनुमंत धोत्रे व मनोज राऊत यांनी या कारवाईत सहकार्य केले. रात्री उशिरापर्यंत याबाबत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

आंगणेवाडी आई भराडी मंदिर १२ ते १४ डिसेंबर राहणार बंद

पोईप । वार्ताहर

मालवण तालुक्यातील आंगणेवाडी येथे प्रती पंढरपूर म्हणून दक्षिण कोकणात ओळखल्या जाणाऱ्या व लाखो भाविकांच्या नवसाला पावणाऱ्या आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीची जत्रा २२ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. गुरुवारी सकाळी देवीचा हुकूम घेऊन सदर तारीख निश्चित करण्यात आली.

आंगणेवाडी जत्रा कोणत्याही तिथीवर अवलंबून नसते. देवीचा कौल घेऊनच यात्रेचा दिवस ठरविण्यात येतो. यावेळी सुमारे दहा लाखांपेक्षा जास्त भाविक यात्रेस उपस्थिती दर्शवतील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आंगणेवाडीत येणारे लाखो भाविक देवीच्या दर्शनाची आस घेऊन येतात. वस्त्रालंकारांनी सजविलेली देवी याची देही याची

डोळा पाहुन जिवनाचे सार्थक झाल्याचा अनुभव भाविकांना या ठिकाणी येतो. याच लाखो भाविकाना केंद्रबिंदु मानुन भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय न होता आई भराडी मातेचे दर्शन होण्यासाठी आंगणे कुटुंबिय आंगणेवाडीचे सर्व सदस्य मेहनत घेत असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष छोटू आंगणे यांनी दिली आहे. अनेक व्यापारी, व्यावसायिक यांना रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या या यात्रोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणात मुंबईकर चाकरमानी उपस्थिती दर्शवितात.

आंगणेवाडी जत्रेची तारीख निश्चित झाल्यानंतर रेल्वे तसेच खाजगी वाहनांच्या बुकिंग साठी चढाओढ लागली आहे. प्रथेनुसार देवीला कौल लावून जत्रेची तारीख निश्चित झाली आहे. राजकीय क्षेत्रातील सर्व पक्षिय नेते जत्रेस उपस्थिती दर्शवीत असल्याने ग्रामस्थ मंडळा बरोबरच शासनाची सुद्धा या यात्रेच्या नियोजनासाठी एक प्रकारची कसोटीच लागते. जत्रेची तारीख आता जाहीर झाल्याने पूर्व तयारीस लवकरच प्रारंभ होणार आहे. जत्रेच्या तारीख ठरविण्याचा कौल झाल्या नंतर श्री देवी भराडी मंदिर आज १२ डिसेंबर ते १४ डिसेंबर असे तीन दिवस धार्मिक विधीसाठी बंद राहणार आहे. कुणालाही प्रवेश दिला जाणार नाही. भाविकांनी नोंद घेण्याचे आवाहन आंगणे कुटुंबीय आंगणेवाडी यांनी केले आहे.

जिल्हा वाहतूक कार्यालय दुपारच्या वेळेत बंद का ?

ओरोस । प्रतिनिधी

सिंधुदुर्गनगरी पोलिस ठाण्यानजीक असलेले जिल्हा वाहतूक शाखा कार्यालय दुपारच्या वेळेत बंद असल्याची तक्रार सावंतवाडी-सालईवाडा येथील जयंत बरेगार यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सोबत कुलूपबंद असलेल्या कार्यालयाचा फोटो जोडला आहे. पोलिस अधीक्षक अग्रवाल यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मी ७ डिसेंबरला दुपारी २.३० ते २.४५ च्या सुमारास सिंधुदुर्गनगरी पोलिस ठाण्यात माहिती अधिकारातील मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करण्यासाठी गेलो होतो. वाटेत समोरच जिल्हा वाहतूक शाखा कार्यालय आहे. या कार्यालयाला कुलूप लावलेले होते. माहितीचे घेऊन सायंकाळी ४ वाजता निघालो तरी हे कार्यालय बंदच होते. माझ्या मोबाईलवर मी त्याचा फोटो काढला असून तो सोबत जोडला आहे. या प्रकाराची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी बरेगार यांनी केली आहे. यापूर्वीही तीन वेळा हे कार्यालय बंद स्थितीत असल्याचे फोटो काढून सोशल मीडिया, प्रिंट मीडियामध्ये पाठवून बातमी प्रसिद्धीस दिलेली होती. त्यानंतर दुपारचे कार्यालय बंद करून हा प्रकार थांबल्याची खात्री केली. त्यामुळे तक्रार केली नव्हती; परंतु पुन्हा हा प्रकार सुरू झाल्याचे आढळल्याने ही तक्रार करत आहे. या कार्यालयाबाहेर कार्यालयीन कामकाजाचे दिवस, कार्यालयीन कामकाजाची वेळ व कार्यालय बंद असल्यास कोणत्या क्रमांकावर संपर्क साधावा, याची माहिती लावण्याबाबत आदेश द्यावेत, असे नमूद केले आहे.

भालावल येथील तरुणाचा खूनच : मुख्य संशयिताला अटक भालावल येथील संतोष गुळेकर मृत्युप्रकरणी संशयित ताब्यात

बांदा । वार्ताहर

भालावल-फौजदारवाडी येथील संतोष नारायण गुळेकर (४६) या तरुणाचा मृतदेह मंगळवारी संध्याकाळी उशिरा राहत्या घरात संशयास्पदरित्या आढळून आला. त्यांच्या डोक्यावर पाठीमागील बाजूस वार केल्याची जखम असल्याने हा घातपात असल्याचा पोलिसांचा संशय आहे. यानुसार पोलिसांनी तपास करून मुख्य संशयित चेतन परब (भालावल) याला अटक करण्यात आली तर अन्य संशयितांची बुधवारी उशिरापर्यंत चौकशी करण्यात येत होती. दरम्यान, संशयिताने आपल्याकडून झालेल्या वादातून खून झाल्याची कबुली पोलिसांना दिली.

मंगळवारी संतोष हा राहत्या घराच्या पाठीमागील बाजूकडील पडवीत पायर्यांवर मृतावस्थेत आढळला. त्याच्या मृतदेहावर पूर्णपणे मुंग्या होत्या. तो घरात एकटाच राहत असल्याने सुरुवातीला ही घटना कोणाच्या लक्षात आली नाही. ही घटना मंगळवारी उशिरा समजल्यानंतर त्याचा भाऊ पंढरीनाथ गुळेकर यांनी त्याच्या घरी धाव घेतली. बांदा पोलिसांना खबर दिल्यानंतर पोलिस निरीक्षक विकास बडवे, उपनिरीक्षक सुनील पडवळ, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक डी. एम. पवार, हवालदार राजेश गवस यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह मंगळवारी उशिरा बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात विच्छेदनासाठी आणण्यात आला. बुधवारी सकाळी मृतदेहाचे विच्छेदन करण्यात आले. मात्र मृत व्यक्तीच्या डोक्याला झालेली जखम ही लागलेली नसून कोणीतरी वार केला असा पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली.

बांदा पोलिसांनी भालावल येथे जावून माहिती घेतली असता मृत व्यक्तीच्या घरी घटना घडण्याच्या आदल्या दिवशी त्याचे काही मित्र हे दारू पार्टीसाठी रात्री एकत्र जमले होते. यावेळी पोलिसांनी त्या मित्रांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेतले. यावेळी चेतन रवींद्र परब याने आपल्याकडून झालेल्या वादात खून झाल्याची कबुली पोलिसांना दिली. यावेळी त्यांच्या सोबत त्यावेळी उपस्थित असलेल्या सगळ्यांची पोलिसांनी कसून चौकशी केली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक ऋषिकेश रावले तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी विनोद कांबळे , बांदा पोलिस निरीक्षक विकास बडवे व अन्य कर्मचारी यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. मुख्य संशयित चेतन परब याला गुरुवारी न्यायलात हजर करण्यात येणार असल्याचे बांदा पोलिस निरीक्षक विकास बडवे यांनी सांगितले.बुधवारी उशिरा पर्यंत बांदा पोलिस ठाण्यात अन्य संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे काम चालू होते. मृत संतोष गुळेकर याचा पुतण्या नितीन गुळेकर यांनी संशयितांविरोधात फिर्याद दाखल केली आहे.

मृत संतोष गुळेकर, मुख्य संशयित चेतन परब व अन्य सहा संशयित हे आंबोली येथे जत्रेला गेले होते. त्यानंतर रविवारी संध्याकाळी चेतन परब यांच्या घरी पार्टीचे नियोजन करण्यात आले. यावेळी दारूच्या नशेत चेतन व संतोष यांच्यामध्ये वादाला सुरुवात झाली. यावेळी चेतनचा रागाचा पारा चढल्याने त्याने दारूच्या नशेत प्लास्टिकची खुर्ची उचलून संतोषच्या डोक्यात मारायला सुरुवात केली. यावेळी जीव वाचवून पळून जाण्याच्या नादात तो घराच्या मागच्या पडवीत जावून कोसळला. यावेळी पार्टीमध्ये असलेले सर्व तेथून पळून गेले. त्यानंतर संतोष हा आपल्या घरात मंगळवारी मृत अवस्थेत सापडून आला. मात्र या सार्या घटनेत संतोष चेतनच्या घरी पडला. पण त्याचा मृतदेह स्वतःच्या घरी कसा सापडला याचा उलगडा अद्यापही झाला नसून याचे गूढ अजून कायम आहे. अधिक तपास बांदा पोलिस निरीक्षक विकास बडवे करत आहेत.